Impact Factor - 3.452 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March - 2018

SPECIAL ISSUE-XLVI

# आदिवासी (Tribal)



**अतिथी संपादक :**

**डॉ.ज्योत्स्ना सोनखासकर**

प्राचार्या,

म.वि.प्र.समाजाचे गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला,

भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सिन्नर जि. नाशिक (महाराष्ट्र)

**मुख्य संपादक :**

**डॉ. धनराज धनगर**

सहा. प्राध्यापक

म.गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,

येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)

**विशेषांक कार्यकारी संपादक :** प्रा. ए.ए.पोटे, प्रा. आर.डी. आगवणे, सिन्नर, जि. नाशिक (महाराष्ट्र)

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 3.452** **ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**March-2018**

**SPECIAL ISSUE-XLVI**

## आदिवासी (Tribal)

**अतिथी संपादक :**
**प्राचार्या डॉ. ज्योत्स्ना सोनखासकर**
**म.वि. प्र. समजाचे गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला,**
**भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**सिन्नर, जि. नाशिक (महाराष्ट्र).**

**मुख्य संपादक :**
**डॉ. धनराज धनगर**
**सहा. प्राध्यापक, मराठी विभाग,**
**म. गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,**
**येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र ).**

**विशेषांक कार्यकारी संपादक : प्रा. ए. ए. पोटे व प्रा. आर. डी. आगवणे**
**राज्यशास्त्र विभाग,**
**म.वि. प्र. समजाचे गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला**
**भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**सिन्नर, जि. नाशिक (महाराष्ट्र).**

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : **www.researchjourney.net**

**© All rights reserved with the authors & publisher**

**Price : Rs. 600/-**

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 46 : आदिवासी (Tribal)
UGC Approved No. 40705 & 44117

ISSN : 2348-7
March 2018

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, **Riyadh Kingdom** of **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalg
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Dr. Gajanan Wankhede** - Baliram Patil College, Kinwat-Nanded **[M.S.] India.**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul.
- **Prof. Atul Suryawanshi** - S. S. M. M. College, Pachora.
- **Prof. B. P. Shewale** - M. S. G. College, Malegaon Camp, Nashik.
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik.

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. Uttam V. Nile** - P. S. G. V. P. Mandals Arts, Cmmerce, Science College, Shahada
- **Dr. Sanjay Dhondare** - Abhay Womens College, Dhule
- **Dr. Rekha Gajare** - Head, Dept. of Hindi, P.O.Nahata College, Bhusawal
- **Dr. Ramesh Sambhaji Kure** - Head, N. W. College, Akhala Balapura Dist-Hingoli
- **Dr. K.T. Khairnar** – Dept. of Commerce, MGV's L.V.H. College, Panchavati Nashik.
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the p on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the paper responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor-**

**Published by -**

© **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik**

**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

ISSN : 2348-7143
March 2018

## INDEX


| Sr. No. | Title of the paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | *Tribal Economic Development in India* | Dr. S. K. Dalvi | 05 |
| 2 | *Quest For Self-Identity and Survival Struggle of Adivasi Community Reflected in Narayan's Novel Kocharethi: The Araya Woman* | Dr. Mohini Gurav | 11 |
| 3 | *Dams and Tribal Peoples in Maharashtra* | Ms. Samita Hande | 16 |
| 4 | *Socio-Economic Status of Tribal Women in India* | Prof. Vijay Nandure | 20 |
| 5 | *Health Status of Tribal Population in Maharashtra* | Dr. Dattaray Wabale & Ms. Swati Gachche | 26 |
| 6 | *Status of Tribal Development in India and Measures* | Dr. S. N. Pagar | 33 |
| 7 | *The study of apache tribes: An geographical overview* | Prof. U. A. Pathade | 36 |
| 8 | *Administrative Process of Tribal Development* | Prof. B. M. Pawar | 40 |
| 9 | *The Picture of Tribals Depicted in Kamala Markadayas's Novel'The Coffer Dams'* | Smt. Dipali Suryawanshi | 46 |
| 10 | *The Adivasiconsciousness in Hansda's the Adivasi Will not Dance* | Prof. Milind Thakare | 49 |
| 11 | *Contemporary Challenges of Maoist (Insurgency) in India* | Dr. Laxman Wagh | 53 |
| 12 | भारतीय स्वतंत्रता आंदोलन आणि आदिवासी चळवळी | नयना गावीत – मिश्रा | 61 |
| 13 | नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचा राजकीय सहभाग | डॉ.व्ही.डी.कापडी | 64 |
| 14 | महाराष्ट्रातील आदिवासी विकास चळवळ आणि राजकारण | प्रा.राजेंद्र आगवने | 69 |
| 15 | डोंगऱ्यादेव : कोकणी- कोकणा समाजाचे श्रद्धास्थान | प्रा. सुभाष अहिरे | 75 |
| 16 | आदिवासींचे कायदेशीर मानवीहक्क व वस्तुस्थिती | श्री.किरण आंबरे | 84 |
| 17 | ॲट्रोसिटी अॅक्ट आणि दलित व आदिवासी समाज | प्रा.शंकर आवारे व प्रा.श्रीकांत गाडे | 93 |
| 18 | महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ | डॉ.वैशाली बागुल | 99 |
| 19 | महाराष्ट्रातील आदिवासींचे राजकीय जीवन आणि राजकीय समस्या एक आढावा | डॉ.विलास बनसोडे | 103 |
| 20 | आदिवासी जीवनावरील नक्षलवादाचा प्रभाव | श्री. आकाश बांगर | 108 |
| 21 | आदिवासींचे कृषी व मानवी जीवनातील स्थित्यंतरे | प्रा. अशोक भवर | 112 |
| 22 | आदिवासी : लोकभ्रम (अंधश्रद्धा ) | प्रा. विलास देशमुख | 116 |
| 23 | आदिवासी समाजाचे नेतृत्व व भूमिका | प्रा. प्रदीप देशपांडे | 122 |
| 24 | आदिवासी समाजाच्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना | प्रा. डी. टी. ढगे | 128 |
| 25 | भारतातील आदिवासी समाज-समस्या आणि कायदे | प्रा.अशोक डिंबर | 138 |
| 26 | महाराष्ट्रातील आदिवासी चळवळींचे अवलोकन | डॉ. विजय तुंटे | 146 |
| 27 | नाशिक जिल्ह्यातील आदिवासी नेतृत्वाची आदिवासींच्या विकासातील भूमिका | डॉ. प्रल्हाद दुधाने | 159 |

| | | | |
|---|---|---|---|
| 28 | आदिवासींच्या कवितेची वाटचाल | डॉ. दत्तात्रय फलके | 163 |
| 29 | भारतीय आदिवासी विवाह् पद्धती | प्रा. श्रीमती शकुंतला गायकवाड | 165 |
| 30 | आदिवासी संस्कृती आणि लोकसाहित्य | प्रा. एस. पी.जाधव | 171 |
| 31 | आदिवासी विकासात पेसा कायद्याची भूमिका | प्रा.सुनिता जगताप | 175 |
| 32 | आदिवासींच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळी | प्रा. हर्षदा जोशी | 183 |
| 33 | आदिवासी समाजाच्या सामाजिक चळवळीतील सहभाग | प्रा.नामदेव काकड व प्रा.विष्णू बोरसे | 186 |
| 34 | आदिवासी (भिल्ल) जीवनशैली व व्यवसाय (विशेष संदर्भ पिंपळगाव निपाणी) | प्रा. सुनील कर्डक | 190 |
| 35 | आदिवासींची ऐतिहासिक पार्श्वभूमी व जीवन | प्रा.एस.एस.कावळे | 195 |
| 36 | महाराष्ट्रातील आदिवासी महिलांचा राजकीय सहभाग | प्रा. गणेश लिंबोळे | 200 |
| 37 | आदिवासी समाज आणि चळवळी | प्रा.भागवत महाले | 203 |
| 38 | आदिवासींची सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळ | प्रा. संजय मराठे | 208 |
| 39 | आदिवासी व स्वराज्य (विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा) | प्रा. मदन पाडवी | 213 |
| 40 | भारतीय आदिवासींचा कायदा व न्याय | प्रा.श्रीमती अर्चना पगार | 219 |
| 41 | आदिवासींचे पक्षीय राजकारण | प्रा. अरुण पोटे | 223 |
| 42 | आदिवासी चळवळ व नक्षलवाद | प्रा.राजेंद्र पवार | 227 |
| 43 | आदिवासी समाजाची ऐतिहासिक वाटचाल | डॉ. वासुदेव डोंगरदिवे | 236 |
| 44 | आदिवासींचा विकास | डॉ. नंदा राशिनकर | 241 |
| 45 | आदिवासी शिक्षण | प्रा. हेमलता राठोड | 245 |
| 46 | आदिवासी आणि नक्षलवाद | प्रा.ए.बी.राऊत | 249 |
| 47 | आदिवासी महिलांच्या सामाजिक सबलीकरणात महिला बचत गटाची भूमिका *विशेष संदर्भ रेणापुर व उदगीर तालुका जि.लातूर* | प्रा.सुरेश शहापुरे | 253 |
| 48 | आदिवासी समस्या आणि घटनात्मक तरतुदी | प्रा.प्रवीण शिंदे | 258 |
| 49 | आदिवासी आणि नक्षलवाद : सद्यस्थिती | डॉ. सौ. जयश्री मोरे-बोराटणे | 265 |
| 50 | आदिवासी ऐतिहासिक पार्श्वभूमी व जीवन | प्रा.डी.डी.ठाकरे | 269 |
| 51 | आदिवासींचे सामाजिक जीवन | प्रा.श्रीमती सोनाली ठाकूर | 276 |
| 52 | नक्षलवाद सद्यस्थिती | डॉ.बी. डी.तोडकर | 280 |
| 53 | आदिवासी महिलांचा राजकारणातील सहभाग | श्रीमती कल्पना वाजे | 287 |
| 54 | महाराष्ट्र विधानसभेतील आदिवासींचे प्रतिनिधीत्व | प्रा.मनिष सोनवणे व प्रा.अशोक वाकचौरे | 290 |
| 55 | आदिवासींच्या विकासात शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे योगदान (विशेष संदर्भ जुन्नर व आंबेगाव तालुका) | प्रा. अंकुश सूर्यवंशी | 293 |
| 56 | नाशिक जिल्ह्यातील ब्रिटीशविरोधी आदिवासींचे उठाव | प्रा. संजय सूर्यवंशी | 296 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 46 : आदिवासी (Tribal)
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
March 2018

# आदिवासी चळवळ व नक्षलवाद

प्रा राजेंद्र विश्वनाथ पवार
संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग प्रमुख
सिन्नर महाविघालय सिन्नर

## प्रस्तावना

भारतात प्रचंड आर्थिक व सामाजिक विषमता आहे. अनेक ठिकाणी सर्वसामान्यांचे प्रचंड शोषण सुरू आहे. दुर्गम आदिवासी क्षेत्रातील जनतेची मोठ्या प्रमाणात पिळवणुक होते आहे. सावकार, जमीनदार, सरकारी नोकरशाही व कंत्राटदार यांच्याकडून आदिवासींचे अव्याहतपणे शोषण होते आहे. या शोषित जनतेला डाव्या विचारसरणीच्या रूपाने तारणहार लाभला. कारण प्रस्थापितांच्या पिळवणुकीला बळी पडणा–यामध्ये आदिवासी लोकांची संख्या सर्वाधिक आहे. या शोषित पिढीत जनतेच्या मुक्तीचा नारा देऊन त्यांनी लोकांना आकर्षित केले. कून सन्याल, चारू मजूमदार, जंगल सन्याल व कदम मलिक ही मंडळी त्यात होती. पश्चिम बंगाल, केरळ, बिहार, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओरीसा व आंधप्रदेश या राज्यामध्ये हे आंदोलन पसरले.

अल्पभूधार, शेतकरी, शेतमजुर व वनकामगारांचा नक्षलवाद्यांना पाठिंबा लाभला. जमिनदार, ठेकेदार व सावकार पोलिस आणि जुलमी अधिकारी यांच्याविरूद्ध नक्षलवाद्यांचा विशेष रोख ठेवला. कारण हेच लोक आदिवासींची मोठ्या प्रमाणात पिळवणूक करून त्यांचे शोषण करीत आहेत. ज्यामुळे विकासाच्या मार्गापासून आदिवासी लांब राहत आलेले आहेत. २००८ पासून नक्षलवादाचा घटनांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून पश्चिम बंगाल, ओरीसा, झारखंड, बिहार, छत्तीसगड, मध्यप्रदेश, महाराष्ट्र व आंधप्रदेशात नक्षलवादी घटनांच्या व मोठ्या कारवायांच्या घटना वाढल्या आहेत. आज भारतात माओवादी या नावाने ही चळवळ पुढे आली असून ती केवळ अंतर्गत सुरक्षेला बाधक ठरत नसून राष्ट्रीय सुरक्षेचा सर्वात मोठा धोका झाली आहे.

## प्रस्थापितांविरूद्ध शोषितांचे आंदोलन

पश्चिम बंगालमध्ये साम्यवादी पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतरही जमिनदारी नष्ट करणे, भूमिहीन जमिनीचे वाटप करणे, सावकाराविद्ध कारवाई करणे यासारख्या मागण्यांची दखल घेतली जात नसल्याने चारू मजुमदार व कानू सन्याल या मार्क्सवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी ३ मार्च १९६७ मध्ये दार्जिलिंग जिल्ह्यातील सिलीगुडीजवळील नक्षलबारी येथे सावकार व जमिनदार हल्ला चढवून त्यांची हत्या लुटमार केली. या घटनेचे पडसाद देशातील ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात उमटले. आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम येथेही ३१ ऑक्टोबर १९६७ ला या प्रकाराची पुनरावृत्ती झाली. या उठावानंतर देशभर प्रसिद्धि मिळाली व अनेक शोषित पिढीत लोक या चळवळीकडे ओढले गेले. हीच चळवळ नक्षलवाद म्हणून प्रसिद्ध झाली.

प्रारंभी पश्चिम बंगालमध्ये त्यांना यश मिळाले. त्यानंतर डाव्या विचारसरणीच्या व चीनी क्रांतीने प्रभावित झालेल्या चारू मुजुमदार व कानू संन्याल यांनी २ डिसेंबर १९६८ ला नावाचा गट स्थापन केला. पुढे या गटाचे रूपांतर त्यांनी भारतीय साम्यवादी पक्ष मार्क्सवादी लेनिनिस्ट या पक्षात केले. सशस्त्र क्रांती करून भारतात सर्वसामान्य जनतेची साम्यवादी सत्त स्थापन करणे, हे त्यांचे अंतिम ध्येय होते. बंगालमध्ये त्यांचा उठाव दडपून टाकण्यात आला. त्यानंतर देशभरात ३० पेक्षा जास्त गटांमध्ये नक्षलवादी संघटना विभागली गेली.

ISSN : 2348-7143
March 2018

१९७२ मध्ये नक्षलवादी चळवळीवर बंदी घलण्यात आली. परंतु देशातील दूर्गम क्षेत्रांमध्ये या चळवळीचे अस्तित्व काही प्रमाणात टिकून राहिले.

मध्य व दक्षिण भारतात प्रसार

दक्षिण भारतातील आंध्रप्रदेश, महाराष्ट्र व तामिळनाडूमधील काही नक्षलवादी कोंडापल्ली सितारामय्या नेतृत्वाखाली पिपल्स वॉर गृपची स्थापना केली. मध्य भारतातील त्यांच्या कारवाया सुरू झाल्या. पुढे १९८८ मध्ये सीपीआयएमएल आणि पिपल्स वॉर गृप मुपल्ला लक्ष्मणराव उर्फ गणपतीच्या नेतृत्वाखाली नक्षलवादी करवाया सुरू झाल्या. नेतृत्वाखाली २१ डिसेंबर २००४ ला पिपल्स वॉर गृप व माओईस्ट कम्युनिस्ट सेंटर व इतर भारतीय कम्युनिस्ट पक्ष माओवादी या संयुक्त संघटनेची व या लढाऊ शाखेची स्थापना शेजारी देश नेपाळमध्ये माओवादी पक्षाने जोरदार संघर्ष सुरू केला होता.

महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, कर्नाटक, तामिळनाडू व केरळ या राज्यांमध्ये सीपीआय एमने थोड्याच कालावधीत चां २००८ मध्ये केंद्र सरकारला या धोक्याचे गांभीर्य पहील्यांदा जाणिवले. हरियाण, पंजाब, उत्तरांचल, गुजराथ या राज्यांमध्ये प्रसाराचे या संघटनेचे उद्दिष्टये असून २०५० पर्यंत संपूर्ण भारत आणण्याची त्यांची योजना आहे.

या भागात सरकारी यंत्रणाचे काम खूप अवघड बनले आहे. माओवाद्यांच्या छूप्या पठिंब्याने जबरदस्तीने जमिनी ताब्यात घेतल्यानंतर संबंधित सरकारी विभाग किंवा जमिनमालक पोलिसांकडे केल्यानंतर पोलिसांनी कायदेशीर करवाई सुरू होते. अशावेळी नक्षलवादी अतिक्रमण करणा-या कब्जा न सोडणे व पोलिसांविरूद्ध सशस्त्र विरोध करण्याबाबत नक्षलवादी भडकवितात. याचबरोबर त्यांचे सहानुभूतीधारकही पोलिसांची कारवाई रोखण्यासाठी उभे राहतात. पोलिसांची कारवाई सुरू समर्थक हिंसक कृत्ये करतात. अशावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसबळाचा वापर आपोआपच पोलिस सरकारविरूद्ध जनमत तयार होते.

या संघर्षनंतर प्रचलीत यंत्रण कशी अन्यायी व निष्ठूर आहे, हे बिंबवण्यासाठी त्यांचे सहानुभूतीधारक माध्यामांमार्फत पोलिसांच्या अत्याचाराच्या अतिरंजित बातम्या पद्धतशीरपणे प्रसिद्ध करतात व लोकांमध्ये प्रमाणाम असंतोष निर्माण करण्यात यशस्वी होतात. समाजातील तथकथित बुद्धिवादी अशावेळी त्यांच्या उभे राहून सरकारी यंत्रणा व पोलिसांनी कोंडीत पकडण्याची संधी साधतात.

आदिवासींच्या जनाधाराची मीमांसा

नक्षलवादी चळवळीचा इतिहास जरी सुमारे साडेचार दशकांचा आहे. त्याला आता संघटीत माओवादी चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. सुमारे पंधरा वर्षापासून या चळवळीने संघटीतपणे कारवाया केल्या. केंद्र सरकारने १९९८ मध्ये या आव्हानाचे स्वरूप ओळखले व प्रभावित राज्यांमध्ये समन्वय माओवादाला सामोरे जाण्याचा प्रयत्न केला. तरीदेखीन गेल्या सात वर्षावसून या चळवळीचे कार्यक्षेत्र आहे. २००३ मध्ये केंद्र सरकारने माओवादी चळवळीचा सामना करण्यासाठी विकास आणि सुरक्षा आघाड्यांवर कार्यवाही सुरू केली असली, तरी तिला सकारात्मक असे यश लाभलेले नाही. माओवादी शस्त्रास्त्रांच्या त्याग केला, तरच त्यांच्याशी बोलणी करण्यात येईल अशी भूमिका केंद्र सरकारने घेतलेली

माओवादी चळवळ ही मुलतः राजकीय चळवळ आहे, परंतु केंद्र सरकार अथवा प्रभावित राज्य सरकारांनी ही बाब अद्याप जाहीरपणे मान्य केलेली नाही. त्यांच्या मते हा कायदा व सुव्यवस्थेचो प्रश्न होता, कालांतराने त्यांनी आपल्या विचारांची दिशा बदलवून सामाजिक आर्थिक बाबींमध्ये या समस्येची पाळेमुळे असल्याचे स्वीकारले. आता ही समस्या राजकीय असल्याचे ते केव्हा स्वीकारतील, हे सांगता येत नाही. योजना आयोगाच्या तज्ञ गटाने एप्रिल २००८ मध्ये नक्षलवाद किंवा माओवादी चळवळ हि भूमिहीन, अल्पभूधारक आणि आदिवासींचे भक्कम पाठबळ असलेली ही राजकीय चळवळ असल्याचे मान्य केले होते. सामालिक न्याय, समता, संरक्षण आणि स्थानिक विकास यासाठी ते लढा देत आहेत. असेही मत या गटाने व्यक्त केले होते.

लोकसंख्योच्या प्रमाणात आदिवासींच्या विकासासाठी निधी देण्याचे घटनात्मक बंधन आहे. मात्र, राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे ९१.११ आदिवासी अद्याप दारिद्रयाच्या विळख्यात आहेत, असे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात आढळले आहे. अर्थसंकल्पात मंजूर झालेला निधी आदिवासींसाठी खर्च होत नाही. ४० आदिवासी कुटुंबांना शासनाच्या एकाही योजनेचा लाभ पोचला नसल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले आहे.

गेल्या ४३ वर्षांपासून नक्षलवाद्यांचा धोका जाणवतो आहे. तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी नक्षलवाद किंवा माओवाद हा देशाच्या अंतर्गत सुरक्षेला सर्वात मोठा धोका आहे असे सांगितल्यावर २००३ मध्ये नक्षलवादाच्या गंभीर धोक्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. माओवाद्यांच्या कृत्यामुळे देशातील दूर्गम आदिवासी क्षेत्रातीन वार्षिक अहवालात ९ राज्यातील ५५ जिल्हे नक्षलवाद प्रभावित असल्याचे सांगण्यात आले, तर पुढच्या चारच वर्षात २० एप्रिल २००८ ला केंद्रिय कॅबिनेट सचिवांनी सांगितल की, १६ राज्यातील १८२ जिल्हयात नक्षलवाद्यांची उपस्थिती आहे. १ आज देशातील २० राज्यांतील २२० जिल्हे एकूण ४० भूभाग नक्षलवादामुळे प्रभावित झाला आहे. थोडक्यात माओवादाची व्याप्ती झपाटयाने वाढते आहे.

## नक्षलवादी चळवळीचे स्वरूप

नक्षलवादी चळवळ सामाजिक आर्थिक बाबींमुळे फोफावली असली, तरी पूर्वीपासून तिचे प्रमुख उद्दिष्टे मात्र देशाची सत्ता किंवा राजकीय सत्ता ताब्यात घेणे होणे, हेच आहे. आर्थिक क्षेत्र किंवा देशाचे कल्याण हे नक्षलवाद्यांचे मुख्य उद्दिष्टये नाही. ती एक राजकीय चळवळ असून राजकीय शक्ती म्हणजे देशाची सत्ता हस्तगत करणे, हे तीचे उद्दिष्टये आहे. असे सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलिस अकादमीचे माजी संचालक एस. सुब्रह्मण्याम् यांनी १९९० मध्येच सांगितले होते. परंतू या समस्येकडे हव्या त्या प्रमाणात सरकारने लक्ष दिले नाही.

देशातील आदिवासी लोक अंत्यंतिक दारिद्रय रेषेखाली राहत आहेत. राजकीय व आर्थिक प्रश्न आणि प्रशासनाचा नाकर्तेपणा यामुळे हा हिंसाचार लवकर थांबेल, असे चित्र अद्यापतरी दिसत नाही. अर्थातच राज्य सरकार व माओवादी या दोहांमध्ये चर्चा सुरू होणे, हा एक सोयीस्कर मार्ग आहे, परंतु त्यासाठी माओवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवणे गरजेचे आहे. त्यांचे योगय ते पुनवर्सन होणेही गरजेचे आहे. परंतु आजमितीस सरकार किंवा माओवादी यार्पकी कोणही चर्चेच्या पटावर आलेले नाही. दुसरीकडे संघर्षाच्या क्षेत्रात वाढ मात्र होत आहे.

उघडपणे माओवाद्यांचे समर्थन करणा—या प्रख्यात लेखिका अरूंधती रॉय यांनी या परिस्थितीचे मर्मभेदक वर्णन केले आहे. दांतेवाडात पोलिस दहशतीमुळे साधे कपडे घालतात, तर आदिवासी गणवेश. ज्या शाळकरी

ISSN : 2348-7143
March 2018

मुलांना शाळेत असायला हवे, ती रानवटासारखी पळापळी करतात. खेडी ओसाड बनली आहेत, तर
मात्र माणसांनी गजबजली आहेत.

## आदिवासी क्षेत्रातील मुलांवर परीणाम

माओवाद्यांनी आता सुशिक्षित तरूणांची भरती करण्यास सुरूवात केली आहे. देशातील आदिवासी क्षेत्रातील मुलांनी नक्षलवाद्यांच्या भितीमुळे शाळेत जाणे बंद केले आहे. छत्तीसगढमध्ये हजारो यामुळे परीक्षांमध्ये नापास झाले आहेत. या भागात नक्षलवाद्यांनी शाळांच्या इमारती बॉम्बस्फांटाव्दारे दिल्या. अनेक दूर्गम भागातील शाळकरी विद्यार्थ्यांना बळजबरी पळवून प्रशिक्षण देण्यात येत आहे. याचा मोठा मानसिक परीणाम विद्यांर्थ्यावर होत असून ते शाळा आणि अभ्यास यापासून वंचित होत छत्तीसगढ, झारखंड व देशातील इतर भागांमध्ये हजारो शाळा नक्षलवाद्यांच्या हल्ल्याला बळी पडल्या याचबरोबर बळजबरीने १४१५ वर्षांच्या मुलांना माओवाद्यांच्या कारावायांमध्ये भाग घ्यावा लागत आहे.

मुलांचे बुद्धिपरीवर्तन करणे सोपे जाते. त्यामुळे त्यांना लक्ष बनविले जात आहे. याचा खूप परीणाम त्यांच्या शिक्षणावर होत आहे. शिक्षण आणि अन्न हा मुलांचा प्राथमिक आणि मुलभूत अधिकार त्यापासून ही मुले वंचित राहत असून हा मानवाधिकाराच्या हननाचा मोठा गुन्हा आहे.

## अंतर्गत सुरक्षेसमोरील सर्वात मोठे आव्हान

सरकारी सुरक्षा दले आणि माओवाद्यांना संघर्षात असंख्य निष्पाप लोकांचा बळी जातो आहे क्षेत्रांमध्ये अशांतता निर्माण झाली असून देशाचा विकास व एकात्मतेलाही त्यामुळे धक्का बसतो आहे. किंवा दहशतवादाच्या कोणत्याही प्रकाराने केली नसेल इतकी हानी माओवादी संघर्षामुळे होत आहे. त्याची तीव्रता अनेकांनी लक्षात घेतलेली नाही. विद्यमान राष्ट्रपती व तत्कालीन अर्थमंत्री प्रणव मुखर्जी सीआरएफच्या ७१ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित समारंभात २०१० मध्ये स्पष्ट केले होते की धोका शांतता आणि सुरक्षेसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. वैध मागण्या नाकारल्या जात आहेत हक्कांची अवहेलना होत असून सरकारी यंत्रणा ज्याबाबत पुरेशी संवेदनाशील नाही, अशा लोकांना दाखवणे अत्यंत सोपे आहे तत्पूर्वी केंद्रिय गृहमंत्री पी. चिदम्बरम् यांनी तर राज्य सभेत १५ जुलै २००९ सरकारी यंत्रणा नक्षलवादावर नियंत्रण मिळवण्यात अपयशी ठरल्याचे मान्य केले होते.

माओवादी चळवळ २००९ पर्यंत २२० जिल्ह्यांमध्ये, म्हणजेच देशाच्या सुमारे ४० भूभाग झाली आहे. रेड्ड कॉरिडोअर या नावाने प्रसिद्ध झालेल्या क्षेत्रात ती एकवटलेली होती, जेथे ९२,००० क्षेत्रावर त्यांनी नियंत्रण प्रस्थापित केले आहे. ५०,००० कार्यकर्त्यांसह २०,००० सशस्त्र माओवादी आसल्याचा अहवाल रॉ या गुप्तचर संस्थेने दिला होता. २ काही वर्षांपूर्वी हजारो लोकांचा संहार नेपाळमध्ये माओवाद्यांनी सत्ता प्राप्त केली होती. तेव्हापासून त्यांचा आत्मविश्वास वाढला असून पशुपती तिरूपती पर्यंत या चळवळीचा व्याप्ती वाढवण्याचे उघड मनसुबे त्यांनी व्यक्त केले आहेत. नक्षलवादी केवळ ग्रामीण व आदिवासी भागापूरता मर्यादित होता.

माओवादाने आता नव्या रूपात शहरांच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. माओवादी २००७ च्या अधिवेशनातच आपला संघर्ष शहरांच्या दिशेने नेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शहरांमध्ये आधारक्षेत्र निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. गेल्या चार पाच वर्षामध्ये कोबाड अनेक उच्चशिक्षित माओवादी नेत्यांना शहरामध्ये पकडण्यात आले.[3]

देशातील श्रमजीवी जनतेचे शोषण करणारे आजची लोकशाही मुळापासून उखडणे हा माओवाद्यांचा उद्देश आहे. विचारधारा व कार्याच्या प्रसारासाठी हींसाचार व कट्टरता हा संघटनेचा मुख्य मार्ग आहे. त्यासाठी त्यांनी सरकारी यंत्रणेवर हल्ले करण्यास सुरूवात केली आहे. गेल्या तीन चार वर्षात मोठ्या संख्येने गणीमी सैनिकांद्वारे मोठी आक्रमणे करण्यास प्रारंभ केला आहे. अनेक कारणांमळे माओवाद वाढला असला तरी सरकारी विकास कार्यात होणारा भेदभाव त्याला आधिक कारणीभूत आहे. त्यामुळे या पिळवणूकीला कंटाळून त्या लोकांनी शस्त्रे हातात घेतले आहे.

विकासाचा आभाव आणि त्या विकासाला भ्रष्टाचारानें निर्माण झालेले अडसर नक्षलवादाला चालना मिळण्यामागचे एक कारण असून माओवाद्यांनी काही प्रमाणात का होईना, जमीणीचे वाटप यासारख्या बाबी केल्या मुळेच त्यांना ब—यापैकी जनाधार लाभतो आहे.

योजना आयोगाने २००६ मध्ये डी. बंधोपध्याय यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली होती. देशातील मोठ्या संख्येने आदिवासी व मागासवर्गीयांना सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतीक भेदभाव सहन करावा लागतो. असे या समितीने स्पष्टपणे नमुद केले. देशाच्या अनेक भागांमध्ये लोकांचे सबलीकरण होत नसल्यानेच हे लोक माओवादाकडे आकर्षित होत असल्याचा निष्कर्ष या समितीने काढला आहे. अहवालामध्ये अत्यंत मार्मीक मांडणी करीत स्पष्ट करण्यात आले आहे की, आमच्या जवळ दोन शब्द असतात... दोन शब्द शिक्षणासाठी, दोन आरोग्यासाठी, दोन वाहतुक आणि दोन शब्द निवा—यासाठी.... एकूणच आमचे धोरण उच्चभ्रू वर्गासाठी एक आणि गोरगरीबांसाठी दुसरी अशाप्रकारची असतात.

देशातील दुर्गम जंगलग्रस्त भागातील शिक्षण, आरोग्य, संचार, घर, रोजगार या मुलभूत समस्यांकडे अध्यापही पुरेसे लक्ष देण्यात आलेले नाही. पुरातन ब्रिटीश कायद्याचा आधार घेवून सरकार लोकांच जमीनी कठोरपणे ताब्यात घेत आहेत. प्रशासन आणि राज्य संस्थानी निर्माण केलेल्या पोकळीत नक्षलवादी कार्यरत आहेत. स्थानिक मागण्यांना आधार देऊन तसेच पिळवणुक होणा—या लोकांना पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचे अश्वासन देऊन बंदूकीच्या नळीतुन सत्ता परीवर्तन करण्याचे अभिवचन देऊन ते वर्चस्व वाढवित आहे. असे नक्षलवादावर संसदेत ठेवण्यात आलेल्या स्टेटस रीपोर्टमध्ये स्पष्टपणे नमुद करण्यात आले आहे.

माओचवादी बंडखोर त्यांच्या संघर्षात स्त्रिया व मुलांचा ढाल म्हणून वापर करीत असल्याचा आरोप राज्यसरकारने केला. माओवादी विप्लववादाने देशाचा १/६ भाग व्यापला असून ते भारताच्या सुरक्षेसमोरील मोठे अव्हान आहे. परंतु जेव्हा समस्याही पुर्णपणे लष्करी नसून विकासात्मक उपाययोजनेसाठी जनतेकडून आक्रोष होत आहे. तेव्हा आदिवास्यांची जमीन, जंगल आणि खाणींच्या संदर्भात जीवन व मृत्युचा मुलभुत प्रश्न उद्भवतो. माओवादी आणि सुरक्षा दलाच्या संघर्षात दोन्ही पक्षासह असंख्य निष्पाप लोकांचाही बळी जात आहे.

या देशात एकीकडे श्रीमंताची संख्या वाढते आहे तर दुसरीकडे देशातील ७७ जनता दारिद्रय रेषेखाली राहतो. गेल्या दोन दशकापासून सुरू असलेल्या आर्थिक सुधारणेपासून हा वर्ग वंचित असून अधिका अधिक गरीब होत चालला आहे. त्यांचे दररोजचे उत्पन्न केवळ २० रू आहे. देशातील ८६ मजुर असंघटीत आहेत. त्यांना न काही सुरक्षा, मिळते न कामाचा पुरेसा मोबदला मिळतो सरकार सुमारे ११ कोटी देशाच्या लोकसंख्यंच्या सुमारे ९.५ आदिवासींच्या खनिज संपत्तीने संपन्न असलेले भूक्षेत्र जिंदाल, मिततल, टाटा व इतर कंपन्याना आंदन म्हणून देत आहे. त्यामुळे लक्षावधी आदिवासी विस्थापित होऊन भिकेला लागून माओवादाकडे खेचले जात आहे. या देशाचे मुळचे रहीवासी असलेले आदिवासीच या देशातील सर्वात दरिद्रि लोक आहे. आपण ज्यांना वसाहतवादी म्हणतो त्या अमेरीका व ऑस्ट्रेलिया सारख्या देशांमध्येही एखाद्या प्रकल्पासाठी जर

आदिवासींची जमिन ताब्यात घेण्यात आली तर त्यांचे पुर्नवसन योग्य प्रकारे करण्यात **येते**. प्रकल्पातील नफ्यातही त्यांना वाटा देण्यात येतो.

*भारतात प्रारंभीक असूनही आदिवासींच्या अनेक समस्यांकडे सरकारचे दुर्लक्ष आहे.* [redacted] *हक्कांसाठी लढणा–या दुयामणी बिर्ला यांनी पुढील मत व्यक्त केले आहे. आदिवासींच्या हक्कांचे* रक्षण करण्यात सरकारला अपयश आल्यामुळेच जे आपल्या मुलभूत हक्कांसाठी लढत आहे अश्या माओवाद्यांना त्यांनी समर्थन देण्यास प्रारंभ केला आहे. अर्थातच कागदावर सरकारच्या अनेक योजना आहेत. आदिवासींवर प्रचंड खर्च करीत असल्याचेही सांगण्यात येते पण तो त्यांच्या पर्यंत पोहचतच नाही. म्हणून प्रख्यात अर्थतज्ञ भरत झुनझुनवाला म्हणतात की आदिवासींसाठी योजना देण्यासाठी एका हेलीकॉप्टर मध्ये पैसे भरून ते त्यांच्या क्षेत्रात आकाशातुन फेकून दिले तर ते तरी आदिवासींना मिळतील

डाव्या विचारसरणीच्या या संघटनांचा दावा आहेत की, भुमिहीन, शेतमजुर , आदिवासी व दलित लोकांचे शोषण आणि पिळवणुक थांबवण्यासाठी व त्यांचे जमिनीवरील हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी क्रांतीकारी लढा सुरू केलेला आहे. आता त्यात विस्थापित, शहरातील बेकार, सेझसह विविध प्रकल्पग्रस्त व निरनिराळया कारणांमुळे प्रभावित झालेल्या लोकांची भर पडते आहे. सरकारच्या आर्थिक व राजकीय धोरणांमुळे यात सामिल होऊ पाहणा–यांची संख्या आता नजिकच्या काळात झापाट्याने वाढण्याचा संभव आहे.

भारत सरकार आणि माओईस्ट विप्लववाद्यांमधील संघर्ष आज शिगेला पोहचला आहे. जमिन व जंगलावरील हक्क आणि शोषण व पिळवणुकीला विरोध यासाठी या संघटनेचे हिंसात्मक चळवळ उभी केली नक्षलवादी किंवा माओवादी चळवळ राज्य सरकारचे नव्हे, तर केंद्र सरकारनेही गांभीर्याने घेतली नसल्याचे अनेक अंतर्गत सुरक्षा तज्ञांचे मत आहे. खाऊजा खुले आर्थिक धोरण खाजगीकरण आणि जागतिकीकरण या बदललेल्या वातावरणामुळे निर्माण झालेल्या परीस्थितीचे कोणतेही लाभ जनसामान्यांपर्यत पोहचत नाहीत.

राष्ट्राच्या संपत्तीत किंवा विकासात जनसामान्यांना पुरेसा वाटा मिळत नाही. त्यांच्या अन्न वस्त्र निवारा शिक्षण आरोग्य व रोजगार या मुलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत. विकास व प्रगतिपासून वंचित राहत आहेत त्यामुळे दिवसेंदिवस माओवादाची व्याप्ती वाढत चालली आहे. या संघटनेचा नेपाळ, श्रीलंका, बांग्लादेश नव्हे तर फिलिपाईन्ससह जगातील इतर अनेक डाव्या विचारसरणीच्या संघटनेशी संपर्क स्थापित झाला आहे माओवादी चळवळीला पयबंद घालण्याची कोणतीही सुत्रबंद्ध योजना आजतरी दिसत नाही.

**महाराष्ट्र**

महाराष्ट्रात आदिवासींची संख्या ९ आहे. आज ही संख्या सुमारे एक कोटी आहे. आदिवासींच्या विकासाची जबाबदारी राज्य सरकारवर आहे. राज्यातील ६३६,००० आदिवासी कुटूंबापैकी ५७८,१३६ कुटूंबे दारिद्रयात जगत असून ८३ भूमिहीन आहेत. आदिवासी विकासाच्या शासनाच्या अनेक योजना आहेत. परंतु त्यांच्या स्थितीत सुधारणा होत नाही. अर्थसंकल्पातील ५ टक्केही खर्च होत नाही. १९९३–९४ मध्ये सुकथनकर समिती स्थापन करण्यात आली. परंतु १७ वर्षानंतर अद्यापही शासनाने त्यासाठी निधीची तरतुद अर्थसंकल्पात केलेली नाही. यालट या १७ वर्षामध्ये ८,२३९ कोटी रूप्ये अन्य कामांसाठी वळविण्यात आले आहेत. ही महाराष्ट्रातील परिस्थिती असून इतर राज्यांमध्ये यापेक्षा वेगळी स्थिती नाही.

महाराष्ट्र आदिवासींच्या योजनांचा पैसा कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे वळविण्यात आला होता याबरोबरच मंजूर असलेला पैसाही योग्य रीतीने खर्च केला जात नाही. आदिवासी योजनांच्या नावावर मोठ्या संख्येने आदिवासी आज बेरोजगार व भूमिहीन आहेत. जून्या अतिक्रमित जमिनी आदिवासींच्या नावाव

ISSN : 2348-7143
March 2018

करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. परंतू शासन त्यांचा मालकीहक्क नाकारत आहे, दुसरीकडे ओरीसा, छत्तीसगड, झारखंड राज्यातील माओवाद्यांनी त्यांच्या प्रभावाखाली हजारो एकर जमिन आदिवासींना कसण्यासाठी उपलब्ध करून दिलेली आहे.त्यामुळे साहाजिकच त्यांचा पाठिंबा माओवाद्यांना मिळतो आहे.

महाराष्ट्रातील सुरवातीपासूनच ही चळवळ चंद्रपूर व नांदेड जिल्ह्यात एकवटलेली आहे. आज चंद्रपूर, गडचिरोजी व भांडार जिल्ह्यातील जंगलग्रस्त भागातच तिच्या कारवाया मर्यादित आहेत. हे संपुर्ण क्षेत्र आदिवासींचे वस्तीस्थान आहे. या क्षेत्रातच महाराष्ट्रातील खाणउद्योग एकवटलेला आहे. बांबू व तेंदूपत्ता या वनउपजांवर या भागातील आदिवासींचे चरितार्थ चालतो. बल्लारशा येथील कागद कारखान्यात प्रामुख्याने या बांबुची विक्रि केली. जाते या सर्व ठिकाणी आदिवासींचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते. त्यामुळे नक्षलवद्यांना पाय रोवण्यास जागा मिळते. आंध्रप्रदेशातील, आदिलाबाद, छत्तीसगडचे बस्तर व मध्ये प्रदेशातील बालाघाट हे सर्व प्रदेश, चंद्रपूर, गडचिरोली व भंडारा या जिल्ह्यांना लागून आहेत. महाराष्ट्रात ८ ऑक्टोबर २००९ यादिवशी गडचिरोली या जिल्ह्यातील लहारीजवळ नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात १७ पोलिसांचा बळी गेल्यानंतर त्यांच्या कारवाया प्रमुख्याने प्रकाशझोतात आल्या.

**कारणे**

- आदिवासी क्षेत्रातीन मागासलेपणा व विकासाकडे सरकारचे झालेले दुर्लक्ष हे नक्षलवादाचा प्रसार होण्याचे मुख्य कारण आहे.
- जमिनदारी व सावकार यांच्या कडून होणारी पिळवणूक, अन्याय व अत्याचार यामुळेच भारतात नक्षलवादाचा जन्म झाला.
- प्रस्थापित समाजघटकांकडून शोषण व जुलूम यामुळे आदिवासी नक्षलवादाकछे ओढले गेले.
- शासकीय यंत्रणेकडून होणारा भ्रष्टाचार व गैरव्यावहार याचबरोबर राजकारण्यांशी असणारी त्यांची साठगाठ यामुळे नक्षलवाद वाढला.
- शेतमजुर व भूमिहीन यांच्या हक्कांकडे होणारे दुर्लक्ष, हे देखीन नक्षलवादाच्या प्रसाराचे एक कारण आहे.
- नक्षलवादाचा पाया भारतातील सामाजिक आर्थिक विषमतेत आहे.
- अनेक राज्यामध्ये कुप्रशासन शिगेला पोहचले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये असंतोष निर्माण होऊन नक्षलवादाला चालना मिळाली.
- विस्थपित होणा–या आदिवांसीचे पुनर्वसन योग्य पद्धतीने होत नस्ल्याने उपजीवेकीचा आधार नसलेल्या लोकांनी नक्षलवादाला जवळ केली पुरातन ब्रिटीश कायद्याचा आधार घेवून कथाकथित विकासाच्या नावाखाली सरकार आदिवासींच्या जमिनी कठोर पणे ताब्यात घेत आहे.
- संपन्न अश्या आदिवासी क्षेत्रातील वनसंपदेचे मोठ्या प्रमाणात अपहरण होत आहेत व त्याबदल्यात कोणताही फायदा या लोकांना होत नाहीत.
- देशातील दुर्गम जंगल ग्रस्त भागातील शिक्षण आरोग्य संचार घर व रोजगार या मुलभूत समस्यांकडे आद्यापही पुरेसे लक्ष देण्यात आलेले नाही.

**राष्ट्रीय सुरक्षेवरील परीणाम**

गृहमंत्रालयाने बंदी घातलेल्या २७ दहशतवादी संघटनामध्ये सी पी आय माओईस्ट चा समावेश आहे. नक्षलवादी किंवा माओईस्ट गनिमांनी लिट्टे, कश्मिरी व ईशान्य भारतातील दहशतवादी संघटनांशी संबंध

प्रस्थापित केले आहेत. जगातील इतर दहशतवादी संघटनांशी त्यांचे संबंध आहेत. नक्षलवादामुळे देशाच्या अंतर्गतच नव्हे, तर सर्वकष सुरक्षेवरही दुष्परीणाम होत आहे.

- खनिजसंपत्तीच्या दृष्टीने संपन्न अशा प्रदेशात नक्षलवादी किंवा माओवादी यांनी वर्चस्व स्थापन केल्यामुळे देशाच्या आर्थिक परीस्थितीवर व विकासावर त्याचा विघातक परीणाम होत आहे.
- देशभर घातपात करण्याच्या नक्षलवादांच्या तंत्रामुळे देशातील वाहतुकीवर परीणाम होत आहे. प्रामुख्याने रेल्वे वाहतुकीला तिचा उपसर्ग झालेला असून त्याचा फटका मात्र अर्थव्यवस्थेला बसत आहेत.
- नक्षलवादांचा बदोबस्त करण्यात केंद्र सरकार व राज्य सरकार अशा दोहांना बराच पैसा व शक्ती खर्च करावी लागत आहे.
- नक्षलप्रभावी क्षेत्रातीन विकासकार्य ठप्प झाल्याने ते क्षेत्र आणखीनच मागासलेले बनत आहे, व लोकांची नाराजी मात्र सरकारविद्ध वाढत आहे. त्याचप्रमाणे देशाच्या एकुण विकासावर त्याचा विपरीत परीणाम होत आहेत.
- सरकार नक्षलवादांव्सर संघर्षात दोन्ही पक्षांसोबत निष्पाप अशा असंख्य लोकांची बळी जात आहेत. त्यात मोठी संख्या ही आदिवासींची आहे.
- या देशाची राजकीय व्यवस्था ताब्यात घेण्याच्या नक्षलवादी संघटनांच्या डावपेचामुळे देशाच्या लोकशाहीसमोर संकट निर्माण झाले आहे.
- नक्षलवाद्यांविरोधी सैन्याचा वापर केल्यास सैन्याचे सीमांकडे दुर्लक्ष होऊन परकीय आक्रमणाचे संकट निर्माण होऊ शकते.
- नक्षलवादाच्या प्रसारामुळे देशाच्या एकात्मतेवर दुष्परीणाम होत आहे.
- नक्षलवादी सरकारे फौजांच्या दरम्यात होणा–या या संघर्षात मानवी हक्कांचे मोठया प्रमाणात उल्लंघन होत आहे.
- दिल्ली, कॅलकाटा व मुबईच नव्हे, तर देशातील अनेक ठिकाणचे उच्चशिक्षित तरूण या चळवळीकडे आकर्षित होत आहेत. एकंदी पूर्वी नक्षलवादाचे रणक्षेत्र हे जंगल होते. आजा माओईस्ट चळवळीने आपला रोख शहरी भागाकडे वळविला आहे. त्यामुळे नजीकच्या काळात नक्षलवाद शहरांमध्ये पसरल्याचेही आपल्याला दिसून येईल.

उपाययोजना

आपली लोकशाही मतपेट्यांवर आधारलेली आहे, तर माओवादी चळवळ बंदुकीच्या गोळयांवर विश्वास ठेवणारी आहे. सत्ता ही बंदुकीच्या नळीतुन वाहते हे माओचे प्रतिपादन त्यांचा जीवन प्रवाह बनलेला आहे. केवळ केंद्र व राज्यातील सत्ताधारी सरकारच नव्हे तर सर्वच राजकीय पक्षांनी माओवादाविरोधातील लढयात पूर्ण इच्छाशक्तीनिशी हा देशाच्या अंतर्गतच नव्हे, तर सर्वकष सुरक्षेला असलेला सर्वात भयानक असा धोका असल्याचे ध्यानात घ्यायला हवे. याप्रसंगी एकमेकांवर दोषारोप करण्यापेक्षा एकत्र येणे आवश्यक आहे.

नोकरशाही आणि राजकारण्यांच्या भ्रष्टाचार हेच नक्षलवाद पनपण्यामागचे एकमेव मुख्य कारण आहे. ग्रीनहंटने आज माओवाद्यांना नष्ट करता येणार नाही. कारण प्रत्येक शोषिताच्या घरात आज माओवादी आहे किंवा नक्षलवादी जन्म घेऊ शकतो. पिळवणुक, अन्याय आणि भ्रष्टाचाराला लगाम लावल्याशिवाय हा संघर्ष थोपविणे अशक्य आहे. खरी चुनौती माओवाद नसून विकास हीच आहे. एकुनच विकासाचा अभाव आणि त्या

विकासाला भ्रष्टाचारामुळे निर्माण झालेला अडसर नक्षलवादाला चालना मिळण्यामागचे कारण असून माओवाद्यांनी काही प्रमाणात का होईना, जमिनीचे वाटप यासारख्या बाबी केल्यामुळेच त्यांना बज्यापैकी जनाधार लाभतो आहे.

भारत सरकारने ईशन्य भारतातील बंडखोरी, पंजाब तसेच जम्मु काश्मीरमधील फुटीरमावाद लष्करी बळावरच सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु माओवाद्यांविरोधी लष्कराचा वापर करण्यास सरकारने नकार दिला आहे. भारत नवनिर्माण म्हणजे लोकांना मेट्रो,चौपदरी रस्ते, फ्लायओव्हर्स देणे एवढे पुरेसे नव्हे. एक लवासा म्हणजे विकास नव्हे सर्व प्रकारच्या प्रगती व विकासाची फळे सर्वांना आणि तीही सारख्या प्रमाणात चाखायला मिळायला हवीत....

- आदिवासी व शोषणाला बळी पडलेल्या लोकांच्या हक्कांचे रक्षण करणे व मागासलेल्या क्षेत्रात रोजगारीची संधी निर्माण करून शोषणमुक्त व्यवस्था स्थापित करणे.
- प्रकल्प बाधितांचे पुनवर्सन योग्य रीतीने करणे व अशा प्रकल्पांची थेट फायदे त्यांना देणे.
- जनसामान्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परीस्थितीत सुधारणा घडवुन विकासकार्याला गती देणे.
- विकासाचे संतुलन साधताना नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रम सुसहय पद्धतीने राबविणे.
- भ्रष्टाचाराला आळा घालणे देशातील राजकीय व प्रशासन व्यवस्था मजबुत करणे दहशतवाद असो की नक्षलवाद हा अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न असून त्याला पायबंद घालण्यासाठी राज्याचे पोजिस दल प्रभावी बनविणे.
- अंतर्गत सुरक्षेच्या सर्व प्रकारच्या धोक्यांचा विचार करूण त्यावर उपाययोजना करण्यासाठी एक समन्वीत असे धोरण आखणे.

संदर्भ ग्रंथ

1. The IDSA ( Journal), Editor The IDSA , pub. New Delhi
2. World Focus( Journal)Editor World Focus,pub. New Delhi
3. Third Concept( Journal),Editor Third Concept.,pub. New Delhi
4. Sakal Nashik 2015,2016
5. lokmat Nashik 2014,2015,2017
6. Diya Marathi Nashik ,2015,2016
7. Deshdoot Nashik 2015,2016,2017
8. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संयुक्त राष्ट्रे – प्रतिमा प्रकाशन, पुणे–डिसेंबर– २००८
9. प्रा.नानासाहेब सांळुके जगाच्या पाठीवर राजश्री प्रकाशन पुणे, –२०००
10. स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ डिसेंबर २००२ २००३
11. चाणक्य मंडल परीवार, नोंव्हेबर २००६